स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade
EXAMINATION SECTION (SCIENCE FACULTY)
Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com

जा.क्र. परीक्षा बीसीए/बीसीएस/समकक्ष/२०१५–१६/2473 दिनांक : ०६/१०/२०१५

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत बी.सी.ए व बी.सी.एस
महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.

विषय:– BCA व BCS या अभ्यासक्रमातील (New Syllabus) विद्यार्थ्यांना सुधारीत (Revise Syllabus) मधील समकक्ष/पर्यायी विषयाची परीक्षा देणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, BCA व BCS या जुन्या अभ्यासक्रमातील (New Syllabus) मधील विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संधी संपलेली असल्यामुळे या विद्यार्थ्यांनी सुधारीत (Revised Syllabus) मधील सर्व विषयाची परीक्षा हिवाळी २०१५ परीक्षे पासून दयावी लागेल असे कळविण्यात आले होते. त्यानुसार महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्रही सादर केलेले आहेत.

तथापी केवळ १–२ विषयात अनुतीर्ण असणा–या विद्यार्थ्यांना सर्व विषयाची परीक्षा दयावी लागत असल्यामुळे समकक्ष विषय देण्यात यावेत अशी विनंती विद्यार्थी, विद्यार्थी संघटना, महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी विद्यापीठास केली होती.

सबब, त्यानुसार BCA व BCS मधील सुधारीत (Revise Syllabus) मधील समकक्ष/पर्यायी विषय निश्चीत केलेले आहेत. सोबत यादी जोडली आहे. काही विषयाकरीता समकक्षता देता येणे शक्य नसल्यामुळे BCA मधील विद्यार्थ्यांनी BCS तर BCS मधील विद्यार्थ्यांना BCA मधील विषय देण्यात आलेला आहे.

कृपया, हि बाब सर्व संबंधित शिक्षक, विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणुन दयावी व सुधारीत अभ्यासक्रमानुसार समकक्ष/पर्यायी विषयाची परीक्षा हिवाळी २०१५ पासुन देण्या बाबत सुचीत करावे ज्या विद्यार्थ्यांनी सर्व विषयाकरीता परीक्षा आवेदनपत्र सादर केलेले असतील त्यांनाही समकक्ष/पर्यायी विषयाप्रमाणे प्रवेशपत्र देण्यात येइल.

सदर सुविधा विद्यार्थी हित लक्षात घेता देण्यात आलेली आहे. पर्यायी/समकक्ष दिलेले पेपर व इतर पेपर हे एकाच दिवशी असू शकतील याबाबत विद्यापीठ जवाबदार राहणार नाही यासाठी विद्यार्थ्यांनी कोणत्या पेपरची परीक्षा दयावी हे त्यानेच ठरवावे हि बाब सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून दयावी, सर्व विद्यार्थ्यांना या नुसार परीक्षा देण्याबाबत कळवावे.

प्र. परीक्षा नियंत्रक